# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.

## दिनांक 17.01.2013 (का.प.क्र.24) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

गुरूवार दिनांक 17.01.2013 (का.प.क्र.24) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.40 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, विधी सहाय्यक तथा प्र.नगर सचिव, श्री.ओ.सी.शिरसाठ यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.आगा खान मिया खान
02. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
03. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
04. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
05. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
06. स. श्री.बाळुलाल वरदाजी गुजर
07. स. श्री. खान अक्रम करीम खान
08. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर
09. स. श्रीमती निलाबाई देविदास जगताप
10. स. श्री.समीर सुभाष राजुरकर

चर्चा :

श्री.बाळुलाल गुजर :शहरात कार्यरत असलेल्या मटनशॉप हे उघडयावर चालविले जातात कायद्यानुसार नियमावलीची अंमलबजावणी न करता दुकाना चालविल्या जात आहे. प्रशासनाने याकडे तात्काळ लक्ष देवुन नियमावलीची अंमलबजावणी न करणाऱ्या दुकानांविरूध्द कडक कारवाई करण्यात यावी.

मा.सभापती :नियमावलीबाबत खुलासा करावा.

श्री.नारायण कुचे :मुकूंदवाडीमध्ये जालना रोडवर दुकानात उघडयावर मांस विक्रीला ठेवलेले असतात. मांस उघडयावर न विकता काच लावुन विक्री करण्यात यावी असा कायद्यामध्ये नियम असेल तर प्रशासन कारवाई का? करत नाही. खुलासा करण्यात यावा. कडक कारवाई करण्यात यावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :रेल्वेस्टेशन ते जयभवानी नगर रोडवरील मटन विक्रेत्यांवर कारवाई केली जात नाही.

पशुसंवर्धन अधिकारी :अवैधरित्या मटनशॉपवर विभागातर्फे वेळोवेळी कारवाई केली जाते. 107 गुन्हे दाखल केलेले आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :दुकानांचे सामान ताब्यात घेण्यात येत नाही.

**मा.सभापती** :सर्व दुकाना अधिकृत आहेत का? खुलासा करण्यात यावा.

**पशुसंवर्धन अधिकारी** :अनाधिकृत दुकाना आहेत व प्रशासनातर्फे त्यांचेवर कारवाई करण्यात येते.

**मा.सभापती** :नियमाप्रमाणे बंद काचामध्ये विक्री करायला पाहिजे. नियमाप्रमाणे व्यवसाय करण्यात यावा.

**पशुसंवर्धन अधिकारी** :38 ते 40 गुन्हे एका महिण्यात दाखल करण्यात आले होते. कारवाई करणाऱ्याविरूध्द मा.आयुक्त,मा.महापौर यांचेकडे निवेदन देण्यात आले. रेल्वेस्टेशन, मुकूंदवाडी येथील नियमाचे पालन न करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्यात येईल.

**मा.सभापती** :नियमाने व्यवसाय करण्यात यावा नसता सिल करण्यात यावे. परवानगी देतांना ड्राईंग जोडण्यात यावे. विभागाचे कंम्पलिशन घेण्यात यावे.

**पशुसंवर्धन अधिकारी** : कंम्पलिशन व पोलीसांचे एनओसी घेतली जाते. तसेच ज्या त्रृटी आहेत त्या दुर केल्या जातील व कारवाई केली जाईल.

**मा.सभापती** :केंद्रिय झु ॲथॉरिटी पथक यांनी प्राणीसंग्रहालयास केलेल्या पाहणीबाबत माहिती देण्यात यावी.

**संचालक,प्राणी संग्राहलय** :महानगरपालिकेचा प्राणी संग्रहालयाचा मास्टर प्लॅन तयार केलेला आहे त्याच्या मंजूरीसाठी केंद्रिय प्राणी संग्रहालयाचे समितीचे पथक दिनांक 10 ते 13.01.2013 रोजी श्री.ए.एस.डोग्रा, पंजाब गर्व्हमेंटचे सेवानिवृत्त पीसीसीएफ आणि डॉ.ए.के.मल्होत्रा, दिल्ली झुचे क्युरेटर आणि सेंटर झु ॲथॉरेटीचे मेंबर पहाणी करण्यासाठी आलेले होते. त्यात काही मुद्दयांची पुर्तता करण्यासाठी सांगण्यात आलेले आहे. प्राणि संग्रहालयाच्या दक्षिणेकडील बाजुस सांडपाण्याचा नाल्यामुळे संसर्गजन्य रोगाचा धोका आहे. त्या ठिकाणी पाणी स्वच्छ करण्यासाठी एसटीपी कार्यान्वित करावे. मागील बाजुस असणाऱ्या खाम नदीचा नाला झालेला आहे त्यापासूनही प्राण्यांना रोग उद्‌भवु शकतात. त्या ठिकाणी बांबुची झाडे व एसटीपी कार्यान्वित करण्यासंदर्भात सूचना केलेल्या आहेत. तसेच प्राण्यांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध करण्यास सांगीतलेले आहे. लॅब अपडेट नाही. दर्शकांसाठी, अपंगव्यक्तींसाठी सुविधा वाढविण्याची सूचना केलेली आहे. आपत्कालिन स्थितीसाठी युनिट उभारण्यास सांगण्यात आलेले आहे. प्राणि संग्रहालयातील पिंजरे दुरूस्ती व इतर दुरूस्ती करण्याचे सुचविलेले आहे. वाघाच्या पिंजऱ्यासमोर हरीणाचे पिंजरे हलविण्याबाबत सूचना केलेली आहे मांसाहारी आणि शाकाहारी प्राणी एकासाईडला करावयाचे आहे. रिवाईझ प्लॅनमध्ये ते काम करण्यात येणार आहे. मास्टरप्लॅनमध्ये किरकोळ सूचना केलेल्या आहेत. पक्षीगृह शिफ्ट करण्यास सांगीतले आहे. वाघ सिंहाचे पिंजरे मोठे करण्याच्या सूचना केलेल्या आहे. मास्टर प्लॅन मंजूर झाल्यानंतर सल्लागार समिती नेमावयाची आहे. त्यासाठी पूर्णवेळ संचालक, पशुवैद्यक व झु-बायोलॉजीस्ट असणे आवश्यक आहे. झु किपरचे 5 ते 6 पदे भरणे आवश्यक आहे. प्राणी

संग्रहालयाची सुरक्षीतता वाढवावी लागणार आहे.

मा.सभापती :दक्षिणेकडील नाल्याच्या ठिकाणी एसटीपी उभारण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात येत आहे.

संचालक,प्राणी संग्रहालय :सदरची संचिका मा.आयुक्तांकडे मंजूरीकरीता पाठविण्यात आलेली आहे. तिथुन कार्यकारी अभियंता पा/पू यांचेकडे पाठविण्यात आलेली आहे.

मा.सभापती :मागील वेळेस कमिटीने निर्णय दिला होता आज पर्यंत एसटीपीची निविदा येणे अपेक्षित होते. संबधीत अधिकारी यांनी स्वत:जातीने लक्ष घालुन एसटीपी कार्यान्वित करण्यासाठी पाठपुरावा करावा. आरोग्य सुविधाबाबत प्रशासनाने माहिती देणे आवश्यक होते ते देण्यात आलेले नाही.

संचालक,प्राणी संग्रहालय :तंत्रज्ञ सुरवातीस नेमणे आवश्यक आहे त्यानंतर यंत्रसामुग्री घेणे उचीत ठरेल नाहीतर पुन्हा यंत्रसामुग्री हाताळण्यासाठी यंत्रणा नाही म्हणुन ऑब्जेक्शन येतील.

मा.सभापती :आऊटसोर्सींगद्वारे तंत्रज्ञ नेमण्यात येतील. प्राणी संग्रहालयात आरोग्य सुविधा तातडीने उपलब्ध करण्यात याव्या जेणे करून प्राण्यांचे आरोग्यावर देखरेख ठेवता येईल अनेक प्राण्यांचे प्राण वाचविता येईल. दर्शकांसाठी सुविधा बाबत खुलासा करण्यात यावा.

संचालक,प्राणी संग्रहालय :अंदाजपत्रक मागविण्यात आलेले आहे.

मा.सभापती :तीन दिवसांपेक्षा जास्त संचिका प्रलंबित राहाता कामा नये. संचिकेवर तारीख नमुद करण्यात यावे.. मास्टर प्लॅनविषयी माहिती देण्यात यावी.

संचालक,प्राणी संग्रहालय :मास्टर प्लॅन तयार केलेला आहे. केंद्रिय पथकाने केलेल्या सुचनेनुसार त्यात बदल करून तीन ते चार दिवसात सर्व स.पदाधिकारी आणि सदस्यांना दाखविण्यात येईल. मास्टरप्लॅन जेवढया रकमेचा तयार होईल त्यातील 70 टक्के केंद्रिय प्राणिसंग्रहालय प्राधीकरण आणि 30 टक्के मनपा असा येईल जवळपास 15 ते 16 कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

श्री.विजेंद्र जाधव :जागेबाबत काही सूचना केलेल्या आहेत का?

संचालक,प्राणी संग्रहालय :जागा कमी आहे. मा.सर्वसाधारण सभेत ठराव घेऊन जागा वाढविण्यात आलेली आहे. गार्डनची जागा घेण्यात आलेली आहे.

मा.सभापती :दर्शक प्राणि संग्रहालयात आल्यावर इन आणि आऊट एकच आहे. तो बदलण्यात यावा. तातडीने किती रक्कम लागणार आहे याची माहिती पुढील स्थायी समितीमध्ये देण्यात यावी.

श्री.बाळासाहेब मुंडे :गुंठेवारी विषयाबाबत मा.पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडलेली आहे. त्यानंतर गुंठेवारी बाबत काही प्रगती झालेली आहे का?

मा.सभापती :गुंठेवारी विषयक बैठक पार पडलेली आहे. बैठकीचे इतिवृत्त तयार झाले असल्यास त्या पध्दतीने काम पार पाडता येईल.

कार्य.अभियंता (पा/पू) :विभागातुन इतिवृत्त अंतिम करून मा.आयुक्तांकडे देण्यात आलेले आहे.

श्री.आगा खान मिया खान: तीन महिण्यांपासून रस्त्याचे काम बंद आहे. सदरील विषयाबाबत निर्णय घेण्यात यावे व लवकरात लवकर रस्ता तयार करण्यात यावा. तसेच वार्डात हापसे काढुन मोटार बसवुन काम चालू आहे. असे अतिक्रमण केले जात आहे. 15 कामे चालु आहे परंतु काहीही कारवाई केली जात नाही. पाच पाच मजली इमारती तयार होत आहे. नियमानुसार कारवाई करण्यात यावी. रस्त्यामध्ये बाधीत झालेल्या वार्डातील काही नागरीकांना प्लॉट मिळालेले आहे परंतु ज्यांना

मिळालेले नाही ते विचारणा करत आहे त्यांचा प्रश्न तात्काळ मार्गी लावण्यात यावा.

मा.सभापती :लेआऊट करून शिल्लक असलेल्या नागरीकांना देणेबाबत निर्णय झालेला आहे. विलंब का होता? खुलासा करण्यात यावा.

उपअभियंता (स्लम) :टाऊन प्लॅनिंग विभागातुन प्रमाणीत यादी आलेली आहे त्यात एकुण लक्ष्मणचावडी ते एमजीएम येथील 55 जणांची यादी होती 8 डिसेंबरला 58 प्लॉट अलाऊट केलेले आहे. सध्या जागेवर 77 प्लॉट उपलब्ध आहेत प्रमाणीत यादी आल्यास त्याचेही वाटप करण्यात येईल.

सहा.संचालक न.र. :तपासणी चालू आहे लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री.नारायण कुचे :मा.न्यायालयाचे जीटीएलला पैसे भरण्याबाबत निर्णय दिला होता त्यांनी ते भरलेत का? तसेच जीटीएलने रोड वाईडींगमधील पोल शिफ्ट केलेले आहे का? खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :जीटीएलला मनपाने पोल शिफ्टींगकरीता 2 कोटी रूपये देण्यात आले होते. कशा पध्दतीने जीटीएलने काम केले, काम पुर्ण झाले का? त्यांचेकडुन हिशोब घेतलेला आहे का? लेखी माहिती देण्यात आलेली आहे का? खुलासा करण्यात यावा.

कार्य.अभियंता (विद्युत) :पाच रोड पोल शिफ्टींगकरीता घेण्यात आले होते काम पुर्ण झालेले आहे. जीटीएलकडुन अद्यापपर्यंत विवरण प्राप्त झालेले नाही.

मा.सभापती :प्रशासनाने समन्वय ठेवुन बचत झालेली रक्कम परत आणण्यात यावी. खर्च कमी झाला असेल तर पालिकेचा पैसा परत दिला पाहिजे. हिशोब घेण्यात यावा.

श्री.असद पटेल :कोणते पाच रोड घेण्यात आले होते.

कार्य.अभियंता (विद्युत) :बलवंत वाचनालय, महात्मा फुले चौक ते पोलीस चौकी पोलीस चौकी ते गुलमंडी, बाराभाई ताजीया, बाराभाई ताजीया ते औरंगाबाद बुक डेपो, पैठण गेट ते सिल्लेखाना, चेलीपुरा ते शहागंज भागातील काम पुर्ण झालेले आहे. कलेक्टर ऑफिस ते शहागंज हे काम पुर्ण झालेल आहे. चेलीपुरा ते लोटाकारंजा हे काम प्रगतीपथावर आहे.

मा.सभापती :प्रशासनाने सदरील विषय गंभिरतेने घ्यावे. पैसे देवुनही पोल शिफ्टींग होत नाही. 2 कोटी डिपॉझिट करून एक वर्ष झालेले आहे तरीही काम पुर्ण झालेले नाही.

कार्य.अभियंता (विद्युत) :याबाबतीत जीटीएलला पत्र देवुन माहिती मागविण्यात येईल तसेच प्रत्यक्षरीत्या जावुन माहिती घेण्यात येईल.

श्री.बाळासाहेब मुंडे :टँकरचा प्रश्न गंभिर आहे. पाण्याच्या प्रश्नाकडे गंभिरतेने लक्ष देण्यात यावे. नागरीकांकडुन पैसे भरूनही टँकर मिळत नाही. दोन बैठकापासून सदरील विषय मांडत आहे.

मा.सभापती :राज्यात दुष्काळस्थिती आहे शासनाने चारा आणि पाणी या दोन विषयावर लक्ष केंद्रित केलेले आहे. शहरात टँकरचे व पाण्याचे नियोजन करीता वेगवेगळे अधिकारी पाहिजे.

कार्य.अभियंता (पा/पू) :39 टँकर कार्यरत असुन 130 अर्ज प्रलंबित आहेत. गुत्तेदाराचे 1 कोटी

39 लाख रूपये प्रलंबित/थकीत आहे. वेळेवर पेमेंट न मिळाल्यामुळे प्रशासन त्यास सक्ती करू शकत नाही. टँकवरील खर्च व वसुली यात मोठी तफावत आहे. खर्च साधारण तीन कोटी व वसुली 85 लाख रूपये आहे. मनपा फंडामधुन रक्कम खर्च करायची आहे. गुत्तेदाराला वेळेवर पेमेंट करण्यात यावे. राज्य शासनाकडे 3 कोटी रूपयांचे अनुदान मागणी केली होती परंतु राज्य शासनाने सदरील विषय मनपाच्या अंतर्गत विषय असुन मनपाने निर्णय घ्यावा. असे कळविण्यात आले आहे.

श्री.बाळासाहेब मुंडे :पाण्याला प्राधान्य देण्यात यावा.

मुख्य लेखाअधिकारी :1 कोटी 29 लाखाचे एकच देयक प्राप्त झालेले आहे त्याचे पार्ट पेमेंट करून 75 लाख रूपये देण्यात आलेले आहे. महिण्याच्या महिण्याला पुर्वी बिल येत होते व ते अदा केले जात होते. एक वर्षाचे बिल लेखा विभागास देण्यात आलेले आहे.एकाच वेळेस पेमेंट अदा करणे विभागास शक्य नाही. संबधीत विभागाने याचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता (पा/पु) :लेखा विभागाने टाईमटेबल दिले पाहिजे की, प्रत्येक महिण्यामध्ये किती बिल देणार? जानेवारी महिण्यामधील रिवाईझ सॅक्शन घेणार आहे. याचे योग्य नियोजन व्हावे. एकमेकांवर ढकलाढकली करू नये? आजही संबधीताचे 1 कोटी रूपये बाकी आहे. योग्य नियोजन केले पाहिजे. 25 लाखाचा चेक देण्यात आला तो बाऊन्स झाला आहे. संबंधीत गुत्तेदाराला वेळेवर पेमेंट देण्यात यावे जेणे करून टँकरद्वारा पाणीपुरवठा करण्यासंदर्भात त्यास सक्ती करण्यात येईल. टँकरचे वेगळे खाते करण्यात यावे म्हणुन लेखा विभागास सूचविण्यात आले आहे. जनरल खात्यात पैसे जमा होतात ते खर्च होतात. बिल अदा करण्याच्या वेळेस रक्कम शिल्लक राहात नाही.

मुख्य लेखा अधिकारी :सदर मुद्दा वादाचा नाही. प्रत्येक विभाग स्वतंत्र खाते उघडा असे म्हणेल तर पैसे जमा होईल का? जनरल खात्यात पैसे जमा होतात वेळेच्या वेळी बिल आल्यास ते देण्यात येते.

कार्य.अभियंता (पा/पु) :रिवाईझ सॅक्शन बाकी होते, सर्वसाधारण सभेची मान्यता झाल्याशिवाय बिल देवू शकत नव्हतो. गुडफेथमध्ये 6 महिने टँकरद्वारा पाणीपुरवठा करण्यात आला. मागील सर्वसाधारण सभेने कार्योत्तर मंजूरी दिल्यानंतर बिल पाठविण्यात आले. यापुढे दर महिन्याला बिल पाठविण्यात येईल.

मुख्य लेखाअधिकारी :पार्ट पेमेंट करून दर महिन्याला पेमेंट अदा करण्यात येईल.

मा.सभापती :जाफरगेट येथील रहिवाशी श्री.विजय सुराणा यांनी त्यांची स्वत:ची विहीर मनपास हॅन्डओव्हर करण्यास तयार आहे. नियमानुसार याबाबतची प्रशासनाने कार्यवाही करावी.

श्री.नारायण कुचे :वार्डात टँकर तात्काळ सुरू करण्यात यावे. नागरीकांनी पैश्यांची भरणा केलेली आहे. टँकर केव्हा सुरू करणार आहे खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती :प्रशासनाने याबाबतीत योग्यरितीने नियोजन करण्यात यावे.

श्री.बाळासाहेब मुंडे :वार्डामध्ये नागरीकांना पिण्याचे पाणी नाही. प्रशासनाने गंभिरतेने लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

**कार्य.अभियंता (पा/पू)** :विभागाची मागणी आहे पेमेंट वेळेवर करण्यात यावे. जेणे करून सदरील पुरवठाधारकास विभागामार्फत टँकरबाबत सक्ती करण्यात येईल.

**मा.सभापती** :लेखा विभागाच्या प्रश्नाविषयी बैठक घेऊन प्रश्न मार्गी लावण्यात येईल. योग्यरितीने नियोजन करून पार्ट पेमेंट करून प्रश्न मार्गी लावण्यात यावे.

**श्री.बाळुलाल गुजर** :सभागृहात वातानुकूलित यंत्रणा बसविण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता अद्यापपर्यंत कार्यवाही झालेली नाही. अधिकाऱ्यांना बसण्यासाठी टेबल नाही.

**शहर अभियंता** :नियोजन करून लवकरच काम हाती घेण्यात येईल.

**मा.सभापती** :आठ दिवसात नियोजन करण्यात यावे.

**श्री.नारायण कुचे** :ए वन व रेटलिस्ट प्रत्येक वार्डाला 3 लाख रूपये खर्च करण्यात यावे म्हणुन आदेशीत करण्यात आले होते. वार्ड अ आणि ब मध्ये विद्युतसाठी 65 लक्ष खर्च झालेले आहे. 1 एप्रिल ते डिसेंबर शेवटपर्यंत सहा प्रभागाची ए वन व रेटलिस्टवर वार्डनिहाय, देखभाल दुरूस्तीवर किती खर्च झाला याबाबतची माहिती देण्यात यावी.

**मुख्य लेखाधिकारी** :याबाबतची माहिती लेखी स्वरूपात पुढील बैठकीत देण्यात येईल.

**मा.सभापती** :प्रशासनाने सर्व वार्ड इंजिनिअर (पाणी पूरवठा, ड्रेनेज, लाईट) यांना बोलावुन नोट बनविण्यात यावे. स्थायी समितीने महत्वाचा निर्णय घेतला होता. वर्षभरामध्ये कशापध्दतीने नियोजन केले. सहा प्रभागाची ए वन रेट लिस्ट बाबत सविस्तर माहिती देण्यात यावी.

**श्री.नारायण कुचे** :लॉटरीवर एलबीटी आकारण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता खुलासा करण्यात यावा.

**मा.सभापती** :खुलासा करण्यात यावा.

**एलबीटी अधिकारी (श्री.पाटणी)**:सुनावणी घेण्यात आलेली आहे. सुनावणी दरम्यान सक्षम अधिकारी उपस्थित नसल्याचे दिसुन आले. त्यामुळे सदरील अधिकारी निर्णय घेऊ शकत नाही असे लक्षात आले त्यामुळे दिनांक 22.1.2013 रोजी सुनावणी ठेवण्यात आलेली आहे. यानंतर एकतर्फी निर्णय घेता येईल.

**<u>विषय क्र. 132 :</u>**

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला गुलमंडी येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील भोलेश्वर व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (23) संबंधाने अर्जदार श्री.पारस प्रेमचंद मुगदिया यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 6.3 चौ.मी. एवढे आहे. सदर दुकान यापुर्वी लिलावाने देण्यात आलेल्या व्यक्तीने ताब्यात घेतली नसल्याने सदर दुकान रिक्त आहे. सदर गाळयांचे वार्षिक भाडे शीघ्र गणकाआधारे रू.23,959/- एवढे होते. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता अर्जदार श्री.पारस प्रेमचंद मुगदिया यांचे मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.23,959/- प्रतिवर्ष निश्चित करून नेहमी इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मा.सभापती** :विषय क्रमांक 132 ते 134 मंजूर

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला गुलमंडी येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील भोलेश्वर व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (23) क्षेत्र 6.3 चौ.मी. रिक्त असलेली दुकान अर्जदार श्री.पारस प्रेमचंद मुगदिया यांनी मागणी केल्यानुसार सदर दुकानाकरीता भाडे र.रू.23,959/- प्रतिवर्ष प्रमाणे आकारून देण्यास व याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 133 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मोहल्ला गुलमंडी येथील महानगरपालिका मालकीचे भोलेश्वर मार्केटवरील पहिल्या मजल्यावरील हॉल भाडे तत्वावर मिळण्यासाठी अध्यक्ष सिध्दी सुधा महिला बचतगट यांनी विनंती केली आहे. सदरील हॉल भाडे तत्वावर देण्यासाठी प्रशासकीय मान्यता झाले असून सदर हॉलचे क्षेत्रफळ 190.78 चौ.मी. एवढे असून सन 2012 चे सिध्द शिघ्र गणकानुसार या हॉल करीता मासिक भाडे रू.24897/- प्रमाणे भाडे आकारणी करण्यासह या शिवाय इतर कर, सेवा कर, सेवा शुल्क व अनामत रक्कम वेगळे राहील. महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीनुसार सदर सभागृह 3 वर्षाच्या कालावधी करीता संस्थेस भाडे तत्वावर देणे बाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला गुलमंडी येथील महानगरपालिका मालकीचे भोलेश्वर मार्केटवरील पहिल्या मजल्यावरील हॉल क्षेत्रफळ 190.78 चौ.मी. सिध्दी सुधा महिला बचतगट यांना रू.24897/- प्रमाणे प्रतिमाह भाडे आकारून व या शिवाय इतर कर, सेवा कर, सेवा शुल्क व अनामत रक्कम तसेच महानगरपालिकेच्या नेहमीच्या अटी शर्तीनुसार सदर सभागृह 3 वर्षाच्या कालावधी करीता सदर संस्थेस भाडे तत्वावर देणेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 134 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सिडको एन-11 येथील मनपा आरोग्य केंद्रावर पहिला मजला बांधणे करीता सन 2008-09 च्या सा.बा. विभागाच्या जिल्हा दरसुचीनुसार रक्कम रू.29,99,500/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले होते. सदरील अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने विषय क्र.697 दिनांक 07/11/2009 अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार निविदा काढण्यात आल्या असता सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा 13.09% कमी दराची निविदा मे.हायवे कन्स्ट्रक्शन यांची प्राप्त झालेली होती. सदरील निविदा प्रस्तावास मा.स्थायी समितीने विषय क्र.222 दिनांक 04/12/2009 अन्वये मान्यता दिल्यानुसार कार्यादेशाअंती सदरील काम हाती घेण्यात आलेले होते.

सदरील काम प्रगतीपथावर असतांना आर्थिक तरतुदी अभावी काम तुर्त बंद करणे बाबतचे आदेश प्राप्त झालेले होते. त्यानुसार काम बंद करण्यात आलेले होते. सदर कामाचा कार्यादेश जानेवारी 2010 मधील असून अंदाजपत्रक सन 2008-09 च्या जिल्हा दरसुची नुसार असल्याने व बाजार भावात 35 ते 40% दर वाढले असल्याने काम करणे परवडत नसल्याने सदर काम आहे त्या स्थितीत अंतिम करणे बाबत गुत्तेदाराने लेखी पत्राद्वारे विनंती केलेली आहे. सदर कामासाठी अर्थसंकल्प सन 2012-13 या आर्थिक वर्षात स्पील ओव्हर अंतर्गत रक्कम रू.38.00 लक्षची तरतुद उपलब्ध आहे. त्यानुसार मा.शहर अभियंता यांचे आदेशान्वये सन 2011-12 च्या जिल्हा दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले रक्कम रू.36,16,802/- चे सुधारीत अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय यांनी मा.स्थायी समिती समोर सादर करणे बाबत शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.36,16,802/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-11 येथील मनपा आरोग्य केंद्रावर पहिला मजला बांधणे करीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.36,16,802/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 135 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भारत सरकारने आपत्कालीन व्यवस्थापन कायदा 2005 नुसार आपत्कालीन परिस्थिती (Disaster Management) ज्यामध्ये भुकंप / चक्रीवादळ/ महापुर/ रोड अपघात/ मोठ्या आगी/ एल.पी.जी.लीकेज/ रस्त्यावरील केमीकल अपघात/ आतंकवाद्यांनी/अतिरेक्यांनी घडवुन आणलेले स्फोट/ दंगली इ.साठी कमीतकमी वेळेत जाऊन संभाव्य जिवीत व वित्तहानी वाचवण्याची जबाबदारी अग्निशमन विभागाकडे सोपवलेली आहे.

विभागीय आपत्कालीन केंद्रातंर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 तसेच विभागीय आपत्ती व्यवस्थापन केंद्र स्थापन केल्याचा शासन निर्णय 2006/ क्र.डी.एम.यु. 2006/सीआर-11/डी.एम.1 दि.25/07/06 नुसार अग्निशमन दलास सेवा पुरवावी लागणार आहे. अशा आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने काम करण्यासाठी खालीलप्रमाणे रेस्क्यु साहित्याची आवश्यकता आहे.

| Sr. No. | DESCRIPTION | QTY | UNIT PRICE IN RS. | TOTAL PRICE IN RS. |
|---|---|---|---|---|
| 01 | Supply Electric Motor / Diesel Engine Driven Air Ventilator along with 6-8 mtr. Long Flexible Duct Hose of 200 mm Dia. | 1 No | 2,81,250/- | 2,81,250/- |
| 02 | Vehical mounnted genrot & engine | 1 No | 6,00,000/- | 6,00,000/- |
| 03 | Hydraulic Dewatering Pump | 1 No | 2,70,000/- | 2,70,000/- |
| 04 | Hydraulic Power Pack | 1 No | 2,81,250/- | 2,81,250/- |
| 05 | Combishear SCS 20 | 1 No | 4,95,000/- | 4,95,000/- |
| 06 | Concrete crusher SCC 20 | 1 No | 5,06,250/- | 5,06,250/- |
| 07 | Power pack, Dieseal / Electric Motor Driven | 1 No | 2,81,250/- | 2,81,250/- |
| 08 | Hand operated pusher jacks | 1 No | 1,96,875/- | 1,96,875/- |
| 09 | Hydraulic Disc 500 | 1 No | 2,53,631/- | 2,53,631/- |
| 10 | Hydraulic Rock splitter Model s-240 | 1 No | 9,33,750/- | 9,33,750/- |
| 11 | 2 Nos of 10 meter long extension Hoses | 1 Set | 2,25,000/- | 2,25,000/- |
| | | Total :- | 41,21,756/- | 41,21,756/- |

उपरोक्त प्राप्त अंदाजपत्रकीय दराचा Estimate amt. र.रू.41,21,756/- चा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा.सभापती :विषय क्रमांक 135 बाबत खुलासा करण्यात यावा.

मुख्य अग्निशमन अधिकारी : अग्निशमन विभागासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक मंजूरीसाठी ठेवण्यात आलेले आहे.

मा.सभापती :फंडींगाबाबत माहिती देण्यात यावी.

मुख्य अग्निशमन अधिकारी :शासनाचे व महानगरपालिकेचे फंडींग आहे.

मा.सभापती : विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विभागीय आपत्कालीन केंद्रातंर्गत औरंगाबाद, जालना, बीड जिल्ह्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 नुसार विभागीय आपत्ती व्यवस्थापन केंद्राद्वारे आपत्कालीन परिस्थितीमध्ये सक्षमतेने व कार्यक्षमतेने काम करण्यासाठी औरंगाबाद महानगरपालिकेच्या अग्निशमन दलासाठी आवश्यक असलेल्या, (प्रस्तावित अ.क्र.1 ते 11) चे रेस्क्यु साहित्य खरेदीसाठी र.रू.41,21,756/- च्या अंदाजपत्रकास (Estimate amt.) सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

याचबरोबर मा.सभापती यांनी राष्ट्रगिताने सभा संपन्न झाल्याचे घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद